Shivaji University, Kolhapur

M.A. (Part -II) (Semester - IV) Examination March/April-2020

Sub : MARATHI

# सराव प्रश्नपत्रिका

१. भाषा विज्ञानाचा सर्वात प्रगत टप्पा म्हणून कोणते अध्ययनक्षेत्र ओळखले जाते?

अ) मनोविज्ञान ब) अर्थविज्ञान क) समाजभाषाविज्ञान ड) शैलीविज्ञान

२. दोन भिन्न भाषिक समाज एकत्रित आल्यावर जी भाषा तयार होते तिला काय म्हणतात?

अ) पिजिन ब) परभाषा क) क्रिऑल ड) बालभाषा

३. वसाहतवादाचे प्रामुख्याने किती कालखंड केले जातात?

अ) एक ब) दोन ब) तीन ड) पाच

४. देशीवाद ही साहित्यसंकल्पना कोणी मांडली?

अ) म.सु.पाटील  ब) भालचंद्र नेमाडे  ब) आनंद पाटील  ड) शंकर पाटील

५. वसाहोत्तरवादाचा सिद्धांत पहिल्यांदा मांडण्याचे श्रेय कोणाला दिले जाते?

अ) होमी भाबा  ब) गायत्री चक्रवर्ती क) एडवर्ड सईद ड) स्पीव्हॉक

६. विज्ञान साहित्याचे अंतिम प्रयोजन कोणते?

अ) शाप देणे  ब) दुख: देणे क) निराशा करणे ड) आनंदी

७. विज्ञान साहित्याच्या केंद्रस्थानी कोण असायला हवे?

अ) माणूस ब) तारा क) राक्षस ड) समंद

८. खालीलपैकी विज्ञान साहित्य लेखक कोण?

अ) अरविंद गोखले ब) वि.स.खांडेकर क) निरंजन घाटे ड) अण्णाभाऊ साठे

९. 'संस्कृती, समाज आणि साहित्य' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) के.रं.शिरवाडकर ब) गणेश देवी क) निशिकांत मिरजकर
ड) वि.वा.शिरवाडकर

१०.संस्कृती संकल्पनेत कोणत्या प्रकारच्या साहित्यकृतीचा विचार अभिप्रेत आहे?

अ) श्रेष्ठ साहित्यकृतीचा ब) लोकप्रिय साहित्यकृतीचा क) कनिष्ठ साहित्यकृतीचा

ड) यापैकी नाही

११. 'सूचीची सूची' या ग्रंथाचे लेखक कोण?

अ) सु.रा.चुनेकर ब) अ.का.प्रियोळकर क)रामदास भटकळ ड) मंगेश पाडगावकर

१२. महाराष्ट्रातील ग्रंथालयांनी कोणती संस्कृती जोपासण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे?

अ) प्रदर्शन ब) ज्ञानदान क) लेखन ड) वाचन

१३. महानुभावीय साहित्य सूचीचा समावेश कोणत्या प्रकारच्या सूचीत करता येईल?

अ) संकीर्ण ब) इतिहास क) प्राचीन ड) वैचारिक

१४. ग्रंथाच्या आतील ज्या दर्शनी पानावर संपादक, प्रकाशक, मुद्रक यांचा उल्लेख असतो त्या पानाला काय म्हणतात?

अ) मुखपृष्ठ ब) शीर्षकपृष्ठ क) संपादकीय ड) मलपृष्ठ

१५. संहितेचे संपादन हे कोणत्या प्रकारचे कार्य आहे?

अ) कलात्मक ब) मनोरंजक क) कष्टदायक ड) बौद्धिक व सर्जक

१६. हस्तलिखित संहितेचे मुद्रण होण्यापूर्वी लिखाणातील चुका दुरुस्त करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात?

अ) संस्करण ब) आविष्करण क) परिष्करण ड) मुद्रितशोधन

१७. 'सविकल्प समाधी' हा समीक्षाविचार कोणी मांडला?

अ) कोलटकर ब) द.के.केळकर क) गो.ग.आगरकर ड) वा.म.जोशी

१८. 'लय सिद्धांत' कोणी मांडला?

अ) शरद पाटील ब) बा.सी.मर्ढेकर क) भालचंद्र नेमाडे ड) वा.म.जोशी

१९. कोणत्या साहित्यविषयक लेखनप्रकारास लेखक व वाचक यांच्यातील दुवा मानले जाते?

अ) समीक्षा ब) दैनंदिनी क) इतिहास ड) लोकसाहित्य

२०. अभिरुचीचे भौगोलिकदृष्ट्या कोणते प्रमुख दोन भेद आहेत?

अ) ग्रामीण आणि नागर ब) महानगरी आणि ग्रामीण क) विदेश आणि देश

ड) प्राचीन आणि अर्वाचीन

२१. 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला' हा साहित्यविषयक वाद कोणत्या दोन लेखकामध्ये आहे?

अ) ना.सी.फडके – वि.स.खांडेकर ब) गो.म.कुलकर्णी – कृ.पा.कुलकर्णी

क) वसंत कानिटकर – द.के.केळकर ड) प्र.के.अत्रे - ना.सी.फडके

२२. वाचकांच्या अभिरुचीला वळण लावण्याचे काम कोण करीत असतो?

अ) समीक्षक आणि लेखक ब) श्रोता क) समाज ड) प्रेक्षक

२३. वैदिक काळात राजा व मंत्री कृषीकर्माची उन्नती करण्यासाठी वर्षातून एकदा कोणते कार्य करीत?

अ) दानधर्म ब) यज्ञ क) नांगर हाकत ड) जमीन पुजत

२४. देशोन्नतीच्या मार्गातील कोणता अडथळा राजश्री शाहू मांडतात?

अ) गरिबी ब) अज्ञान क) लोकसंख्या ड) जातीभेद

२५. जन्मजात उच्चनीच भाव ही कशाची व्याख्या असल्याचे डॉ.आंबेडकरांना वाटते?

अ) ब्राह्मण्य ब) स्वभाव क) समाज ड) जीवन

२६. 'अंधाराची पिलावळ' या कवितेत मुलांच्या अंथरुणाखाली काय सापडल्याचे वर्णन येते?

अ) कागद ब) मांजर क) पैसे ड) जिवंत साप

२७. 'जांभळढव्ह' मध्ये कोणत्या स्त्रीच्या जीवनाची व्यथा येते?

अ) पबी ब) पार्वती क) चंदी ड) काशी

२८. 'विश्वसाहित्य' ही संज्ञा पहिल्यांदा कोणी वापरली?

अ) शेक्सपिअर ब) होनर क) गट ड) टॉलस्टॉय

२९. 'इतिहास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा केंद्रबिंदू आहे' असे कोणी म्हटले?

अ) रेने वेलेक ब) विल्यम शेक्सपिअर क) लॉड मेकलो ड) नॉथ्राफ फ्राय

३०. तौलनिक साहित्याभ्यासाची कोणती प्रमुख ज्ञानशाखा आहे?

अ) अनुकरण ब) प्रभावाभ्यास क) भाषांतर ड) रुपांतर

३१. संत रामदास यांनी कोणता संप्रदाय निर्माण केला?

अ) वारकरी ब) समर्थ क) महानुभाव ड) दत्त

३२. रघुनाथ पंडित यांनी लिहिलेले पहिले काव्य कोणते?

अ) महाभारत ब) रामायण क) रामदास वर्णन ड) गजेंद्र मोक्ष

३३. शाहिरी वाङ्मयाला मराठी काव्याची प्रभात असे कोणी म्हटले आहे?

अ) अच्युत बळवंत कोलवटकर ब) म.वा.धोंड क) अ.ना.देशपांडे ड) पु.ल.देशपांडे

३४. भाषा, समाज आणि संस्कृती हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) सोनाली वानखेडे ब) सोनाली देशपांडे क) सोनाली कुलकर्णी ड) सोनाली माळी

३५. समाजभाषाविज्ञानात भाषिक भांडार ही संकल्पना कोणी मंडळी?

अ) श्मिट ब) सपीर क) वोर्फ ड) जॉर्ज गम्पर्झ